# सरपंच व उपसरपंच यांचे विरुध्द अविश्वास प्रस्ताव - कार्यपध्दती ..



बबन काकडे
तहसिलदार

# कायदेशीर तरतुदी

1. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 चे कलम 35 अन्वये ग्रामपंचायतीचे सरपंच व उप सरपंच यांचेविरुध्द अविश्वास प्रस्ताव दाखल करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

2. मुंबई ग्रामपंचायत (सरपंच किंवा उप सरपंच) अविश्वास ठराव नियम-1975 यात या संदर्भातील नियम दिलेले आहेत.

3. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, यांचे कडील परिपत्रक क्र. / ग्रापनि / 1098 / प्रक्र. 102/21 - अ. दि. 4 जुलै 1998 यात सविस्तरपणे कार्यपध्दती दिलेली आहे.

## अविश्वास प्रस्ताव दाखल करुन घेतांना घ्यावयाची दक्षता..

1. कलम 35 (1) मधील तरतुदीनुसार सभेस उपस्थित राहण्याचा व मत देण्याचा हक्क असणा-या एकूण सदस्य संख्येच्या किमान एक तृतीयांश सदस्यांनी अविश्वास प्रस्तावाची नोटीस दिल्यानंतरच अविश्वास प्रस्ताव मांडता येतो.

2. ही नोटीस मुंबई ग्रामपंचायत (सरपंच किंवा उप सरपंच) अविश्वास ठराव नियम 1975 सोबत दिलेल्या नमुन्यात असावी.

## अविश्वास प्रस्ताव दाखल करुन घेतांना घ्यावयाची दक्षता..

3. ग्रामपंचायतीत निवडून आलेल्या सदस्यांनीच नोटीस दिलेली आहे किंवा नाही हे पडताळून पाहणे आवश्यक आहे. यासाठी नोटीस देणा-या ग्रामपंचायत सदस्यांची नांवे मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम 1959 मधील 'नियम 37' नुसार मा. जिल्हाधिकारी यांनी जाहीर केलेल्या निवडून आलेल्या सदस्यांच्या नावाशी पडताळून पहावीत.

4. अविश्वास ठराव दाखल होण्याच्या दिनांकास सभेस उपस्थित राहण्याचा व मत देण्याचा हक्क असलेल्या सदस्यांनीच नोटीस दिलेली आहे किंवा नाही तसेच अशाच सदस्यांना विशेष सभेची नोटीस दिली जावी याची खातरजमा करण्यासाठी त्या दिनांकास सदस्य म्हणून कार्यरत असलेल्या एकूण सदस्यांची यादी तातडीने संबंधित ग्रामसेवकाकडून प्राप्त करुन घ्यावी. राजीनामा दिलेल्या, मृत्यू पावलेल्या किंवा अपात्र म्हणून घोषित करण्यात आलेल्या सदस्यांस (सक्षम न्यायालयाचा स्थगिती आदेश असल्या खेरीज) विशेष सभेची नोटीस दिली जाऊ नये यासाठी ही दक्षता घेणे आवश्यक आहे.

## अविश्वास प्रस्ताव दाखल करुन घेतांना घ्यावयाची दक्षता..

5. सरपंच व उपसरपंच यांचे विरुध्द एकदाच (एकाच वेळी) अविश्वास ठराव मांडावयाचा असेल तर अविश्वास ठरावाच्या 2 वेगवेगळया नोटीसा देणे आवश्यक आहे.

6. अविश्वास ठरावाच्या मूळ नोटीस सोबत ग्रामपंचायतीच्या एकूण सदस्य संख्ये एवढया जादा प्रती घ्याव्यात तसेच अधिक तिच्या 9 अतिरिक्त प्रती देखील घेण्यात याव्यात.

7. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 चे कलम 35 (3) मधील तरतूदींनुसार सरपंच किंवा उपसरपंच निवडून आल्याच्या दिनांकापासून 6 महिन्यांपर्यंत असा कोणताही अविश्वासाचा ठराव आणता येत नाही. म्हणून सरपंच किंवा उपसरपंच निवडून आल्याच्या दिनांकापासून 6 महिन्यांचा कालावधी पूर्ण झाला असल्याबाबत खात्री करुन घ्यावी.

# अविश्वास प्रस्ताव दाखल करुन घेतांना घ्यावयाची दक्षता..

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 चे कलम 35 (3) मधील तरतूदींनुसार सरपंच किंवा उपसरपंचा विरुध्द गतकाळात मांडलेला ठराव फेटाळण्यात आला असेल तर अशा विशेष सभेच्या दिनांकापासून 1 वर्षाच्या कालावधीत सरपंच किंवा उपसरपंचा विरुध्द असा कोणताही नवीन प्रस्ताव आणता येणार नाही अशी तरतूद आहे.

म्हणून अविश्वास प्रस्ताव दाखल करुन घेतांना सरपंच किंवा उपसरपंचा विरुध्द गतकाळात मांडलेला ठराव फेटाळण्यात आला असेल तर अशा विशेष सभेच्या दिनांकापासून 1 वर्षाचा कालावधी पूर्ण झाला असल्याबाबत खात्री करुन घ्यावी.

# अविश्वास प्रस्ताव टपालात स्विकारु नयेत..

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 चे कलम 35 व मुंबई ग्रामपंचायत (सरपंच किंवा उप सरपंच) अविश्वास ठराव नियम - 1975 यात ग्रामपंचायतीचे सरपंच व उप सरपंच यांचेविरुध्द अविश्वास प्रस्ताव दाखल करण्याची कार्यपध्दती देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर ठराव हा तहसिलदार यांचे समक्ष दाखल करणे अनिवार्य आहे. तथापि असे असतांनाही काही वेळा संबंधित सदस्य असा ठराव तहसिल कार्यालयाच्या टपाल शाखेत देऊन परस्पर निघून जातात. तथापि अशा रितीने टपालात दिलेल्या अविश्वास प्रस्तावावर कार्यवाही करणे शक्य नसते. त्यामुळे अशावेळी पेचप्रसंग निर्माण होऊन गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता असते, म्हणून अविश्वास प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत व कधीही टपाल शाखेने स्विकारु नयेत अशा सूचना संबंधित शाखेतील कर्मचारी यांना द्याव्यात.

## अविश्वास प्रस्तावाची नोटीस प्राप्त होताच करावयाची कार्यवाही.

नोटीस प्राप्त होताच तहसिलदार यांनी त्यावर पृष्ठांकन करावे, सदर पृष्ठांकनात खालील बाबींचा उल्लेख असावा...

1. नोटीस प्राप्त झाल्याचा दिनांक व वेळ.
2. नोटीस सदस्यांकडूनच दिली गेली आहे याबाबत तहसिलदार यांची खात्री झाल्याबाबतचा उल्लेख. (यासाठी ठरावावर "स्वाक्षरी करणा-या सदस्यांना ओळखतो" असे नमूद करुन संबंधित ग्रामसेवक यांची स्वाक्षरी घ्यावी. किंवा सदस्यांची EPIC, आधारकार्ड इ. कागदपत्रे पाहून खात्री करावी.)
3. सदस्यांनी तहसिलदारांच्या समक्ष ठरावावर स्वाक्षरी केल्या आहेत याबाबतचा उल्लेख.
4. नोटीस बरोबर अतिरिक्त 9 प्रती देखील प्राप्त झाल्या आहेत याबाबतचा उल्लेख.

तहसिलदार सा.,

रावेर, ता. रावेर, जि.जळगांव य

महोदय,

आम्ही खालील सह्या क

ग्रामपंचायत ----खामो

पंचायत – खामोडी ----,

यांच्या विरूध्द पुढील कारणा स

१. ग्रामपंचायत --खामो

२. म. सरपंच हे पंचायतीचे

३. म. सरपंच आपले मनाने

४. म. सरपंच यांचेवर आमच

५. म. सरपंच यांनी कोणत्य

घेतले नाही.

वर नमुद केलेली वस्तुस्थि

ग्रा.पं. सदस्यांचे नां

१. सौ. सुनंदाबाई स
२. ज्ञानेश्वर राजारा
३. कैलास शामराव
४. प्रताप मुरलीधर
५. ------------
६. ------------
७. ------------
८. ------------

आज दि 21/8/13 रोजी दुपारी 3.50 वा. सौ. सुनंदाबाई संतोष कोळी वगैरे 04 (चार) सदस्यांनी माझे समक्ष स्वाक्षरी करून प्रस्तुत ठराव दाखल केला आहे. स्वाक्षरी करणाऱ्या सदस्यांची ओळख ग्रामसेवक खामोडी यांनी दिली आहे. तसेच अविश्वास प्रस्तावाच्या सुचनेच्या 9 (नऊ) अतिरिक्त प्रती देखील प्राप्त झाल्या आहेत.

21/8/13 3.50 वा.

तह. रावेर

# विशेष सभेची नोटीस काढतांना घ्यावयाची दक्षता.

सरपंच व उप सरपंच या दोघांविरुध्द एकाच वेळी अविश्वास ठराव दाखल होत असेल तर सदस्यांकडून ठरावाच्या 2 वेगवेगळया प्रती घ्याव्यात, म्हणजेच सरपंचांविरुध्द दाखल होणा-या अविश्वासाची वेगळी प्रत व उप सरपंचांविरुध्द दाखल होणा-या अविश्वासाची वेगळी प्रत घ्यावी, तसेच विशेष सभेची नोटीस काढतांना तहसिलदार यांनी देखील 2 स्वतंत्र (वेगवेगळया) नोटीस काढाव्यात.

## सभेची नोटीस सदस्यांना देतांना घ्यावयाची दक्षता.

अविश्वास ठरावासंदर्भात आयोजित करण्यात येत असलेल्या विशेष सभेची तहसिलदार यांचे स्वाक्षरीची नोटीस व त्या सोबत दाखल झालेल्या अविश्वास ठरावाची प्रत सरपंच, उपसरपंच व इतर सर्व सदस्य यांना द्यावी. तसेच उपरोक्त विशेष सभेची नोटीस व अविश्वास ठरावाची प्रत मिळाले बाबत प्रत्येक सदस्याच्या 2 वेगवेगळया स्वतंत्र पोच पावती घ्याव्यात. म्हणजेच सभेच्या नोटीसीची वेगळी पावती घ्यावी व ठरावाची वेगळी पावती घ्यावी. (अविश्वास ठरावाची प्रत मिळाली नाही म्हणून ठरावातील कारणे आम्हाला समजली नाहीत व त्यामुळे विशेष सभेत बाजू मांडता आली नाही असा युक्तीवाद नंतर सरपंच /उपसरपंच यांचेकडून केला जातो हे टाळण्यासाठी 2 वेगवेगळया / स्वतंत्र पोच पावती घेणे आवश्यक आहे.)

# अविश्वास प्रस्तावाची नोटीस परत घेता येत नाही...

अविश्वास प्रस्तावाची नोटीस दाखल झाली की अशी नोटीस परत घेण्याची कोणतीही तरतूद कायद्यात नाही, त्यामुळे नोटीस प्राप्त होताच बैठक घेण्याची पुढील कार्यवाही करण्यात यावी.

# विशेष सभे संदर्भातील तरतूदी.

1. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 चे कलम 35 (2) नुसार अविश्वास ठरावाची नोटीस मिळाले पासून 7 दिवसांच्या आंत ग्रामपंचायतीची विशेष सभा बोलविणे आवश्यक आहे.

2. सुटीच्या दिवशी जरी अविश्वास ठरावाची नोटीस दिलेली असली तरी 7 दिवसांचा कालावधी हा सुटीच्या दिवसांपासून धरण्यात यावा.

3. तहसिलदाराला त्याचे कचेरीतील दुस-या अधिका-यास सभेचा अध्यक्ष नेमता येत नाही. सभा तहकूब करण्याचाही तहसिलदारास अधिकार नाही. (किशोर फालक विरुध्द विलास महाजन 1197 (3) महा. लॉ.ज. 27,29,30)

## विशेष सभेसंदर्भातील तरतूदी.

4. अविश्वास प्रस्तावाची नोटीस मिळालेपासून 7 दिवसांच्या आंत तहसिलदाराला त्या प्रस्तावावर विचार करण्यासाठी विशेष सभा बोलवावी लागते. (मंदाबाई रोहन वि. अशोक चंदर- 2002)

5. 7 दिवसानंतर बोलवलेली सभा ही अयोग्य आहे. ( गणेश आर समेळ वि. स्टेट ऑफ महाराष्ट्र- 2002)

# या सभेस गणपूर्तीचा नियम लागू नाही....

- गणपूर्तीचा नियम अविश्वास प्रस्तावासाठी बोलवलेल्या सभेस लागत नाही. सभेच्या तारखेपूर्वी ज्याचे विरुध्द अविश्वास प्रस्ताव नोटीस दिली असेल त्या सरपंचाने किंवा उपसरपंचाने राजीनामा दिला असला तरीही त्यामुळे प्रस्तावास बाधा येत नाही.
- अविश्वासाचे प्रस्तावासाठी बोलावण्यात आलेली सभा ही विशेष सभा असते, (मंदाबाई रोहोम वि. अशोक चंदर 2002(1) म.लॉ.ज. 916,921)
- मुंबई ग्रा.पं. सभांबाबत नियम 1959, या सभेस लागणार नाहीत. या सभेचे कामकाज कलम 35 मध्ये दिल्या प्रमाणे व अविश्वासाचे प्रस्तावासंबंधी नियम 1975 प्रमाणे चालेल. (हिंदूराव शिरतोडे वि. स्टेट ऑफ महा. 1999 (1).

## ठरावाच्या 9 अतिरिक्त प्रती तहसिलदार यांनी कोणास द्याव्यात ?

अविश्वास ठरावाच्या मूळ नोटीस सोबत प्राप्त झालेल्या 9 अतिरिक्त प्रती तहसिलदार यांनी खालील व्यक्तींना द्याव्यात व नोटीस दिल्याचा पुरावा दप्तरी ठेवावा.

1. सरपंच
2. उप सरपंच
3. जिल्हा परिषद
4. पंचायत समिती
5. जिल्हाधिकारी
6. विभागीय आयुक्त
7. सचिव (ग्रामसेवक)
8. तहसिल कार्यालयाचा मुलकी शिपाई. (त.का.च्या नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी. )
9. ग्रामपंचायतीचा शिपाई (ग्रामसेवक यांचे मार्फत.) (ग्रा.पं.च्या नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी. )

# प्रत्येक सदस्यास सभेची नोटीस व ठरावाची प्रत दोन्ही देणे आवश्यक.

- अविश्वास ठरावाकरीता बोलावण्यात आलेल्या विशेष सभेची नोटीस सर्व ग्रामपंचायत सदस्यांना (सरपंच व उपसरपंच यांचे सहीत ) देण्यात आल्या आहेत याचा पुरावा म्हणून जावक नोंदवहीमध्ये यासंबंधी नोंद ठेवण्यात यावी.

- सरपंच, उपसरपंच व इतर सदस्यांना विशेष सभेच्या नोटीससह अविश्वास ठरावाची प्रत बजावण्यात यावी व त्यांची स्वतंत्र पोच पावती संचिकेत ठेवण्यात याव्यात.

# नोटीस बजावण्याची पध्दती.

- संबंधित सरपंच, उपसरपंच किंवा इतर ग्रा.पं. सदस्य घरात हजर नसतील तर सभेची सूचना शक्यतो त्या घरातील पुरुष मंडळींना देण्यात यांवी व पुरुष मंडळी उपस्थित नसल्यास त्या घरातील संबंधित महिलेस देण्यात यावी.
- तथापि जर सरपंच व उपसरपंच किंवा इतर सदस्य घरात हजर असतील व त्यांनी सूचना घेण्यास नकार दिला तर सभेची सूचना घराच्या पुढच्या दरवाज्यावर चिकटवावी व तशा आशयाचा स्पष्ट पंचनामा करण्यात यावा.

# विशेष सभा कोठे घ्यावी ?

अविश्वास ठरावासाठी आयोजित केलेल्या विशेष सभेच्या सूचनेत सभेचा दिनांक, सभेची वेळ, सभेचे ठिकाण, नमूद करावे. अविश्वास ठरावाची सभा ग्रामपंचायतीमध्ये किंवा नियमितपणे ग्रा.पं. च्या सभा ज्या ठिकाणी होतात अशाच ठिकाणी आयोजित करण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत ही सभा सरपंच किंवा उपसरपंच यांच्या निवासस्थानी घेण्यात येऊ नये. म्हणजेच अशी सभा ही सार्वजनिक इमारती मध्येच घेण्यात यावी.

# अविश्वास प्रस्तावाची सभा कोणी घ्यावी ?

1. ही सभा स्वत: तहसिलदार यांचे अध्यक्षतेखाली घ्यावयाची आहे. अधिनियमात हे अधिकार दुस-यास देण्याची तरतूद नाही. तथापि तहसिलदार रजेवर असल्यास ज्या अधिका-याकडे त्यांचा कार्यभार रितसर सोपविलेला असेल अशा अधिका-याने ही सभा घ्यावी.

2. तथापि कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला व त्या कामात तहसिलदार व्यग्र असतील तर त्यावेळी नायब तहसिलदार यांनी ही सभा घ्यावी.

# अविश्वास ठरावाची सभा तहकूब करता येते काय ?

1. ही सभा तहकूब करण्याची तरतूद अधिनियमात नाही.
2. सभेच्या पूर्वी ज्यांच्या विरुध्द अविश्वास ठरावाची नोटीस देण्यात आलेली आहे, अशा सरपंच किंवा उपसरपंच यांनी राजीनामा दिला तरीही अविश्वासाची विशेष सभा घेणे बंधनकारक आहे.

# सभेची कार्यपध्दती...

मा.उच्च न्यायालय, यांचे अलीकडील आदेशानुसार असा अविश्वास ठराव एका प्रस्तावकाने (सूचकाने) सभेत मांडणे आवश्यक असून त्यास एका सदस्याने अनुमोदन देणे गरजेचे आहे. सदर प्रस्ताव सभेत कोणत्या सदस्याने (प्रस्तावकाने) आणला व त्यास कोणत्या सदस्याने (अनुमोदकाने) अनुमोदन दिले याबाबतचा स्पष्ट उल्लेख इतिवृत्तात घेणे आवश्यक आहे.

# सभेची कार्यपध्दती...

1. असा प्रस्ताव सभेत आणल्यानंतर अविश्वास प्रस्ताव आणण्याची कारणे नमूद केली जावीत आणि त्यावर चर्चा घडवून आणावी, व झालेल्या चर्चेची नोंद इतिवृत्तात घेण्यात यावी.
2. सभेत होणारी चर्चा ही मांडलेल्या ठरावाच्या नोटीसीत नमूद केलेल्या कारणांवर आधारित असली पाहिजे. वेगळया कारणांवर आधारित असू नये. तथापी चर्चे दरम्यान अधिक एखादे कारण मांडणे गैर नाही.
3. ठराव मांडण्यात आल्यानंतर ज्यांच्या विरुध्द असा ठराव मांडला आहे अशा सरपंच व उपसरपंच यांना त्यांची बाजू मांडण्याचा किंवा चर्चा करण्याचा पूर्ण अधिकार आहे. तशी संधी त्यांना देण्यात आली आहे याची स्पष्ट नोंद इतिवृत्तात घेण्यात यावी.

## ठराव मंजूर होण्यासाठी आवश्यक बहूमत किती ?

- अविश्वास ठराव मंजूर होण्यासाठी पंचायतीच्या सभेस उपस्थित राहण्याचा व मत देण्याचा हक्क असणा-या ग्रामपंचायत सदस्य संख्येच्या 2/3 बहुमतांनी असा ठराव मंजूर होणे आवश्यक आहे. उदा. पंचायतीची सदस्य संख्या 9 असेल तर किमान 6 सदस्यांनी प्रस्तावाचे समर्थन केले असले पाहिजे. बैठकीस केवळ 5 सदस्य उपस्थित राहिले व त्या सर्व सदस्यांनी ठरावाच्या बाजूने मते दिली तरी असा ठराव विधीग्राहय होणार नाही.

## काही उदाहरणे .....

1. ग्रा.पं.ची सदस्य संख्या 11 असेल तर त्याच्या 1/3 म्हणजेच 11/3 = 3.66 म्हणजेच 4 सदस्यांच्या स्वाक्षरी अविश्वास प्रस्ताव दाखल होतांना नोटीसवर असल्या पाहिजेत व 11 च्या 2/3 म्हणजेच 11/3= 3.66 म्हणून 3.66 x 2 = 7.33 अर्थात पुर्णांकात 8, म्हणजेच प्रस्तावाचे बाजूने कमीत कमी 8 सदस्यांची मते मिळाली पाहिजेत. 7 मतांनी तो पारित होणार नाही.
2. सभेस 11 सदस्यांपैकी 9 सदस्य हजर आहेत, त्यापैकी 7 सदस्यांनी प्रस्तावाच्या बाजूने मते दिली तरी सदर 7 ही संख्या पंचायत सदस्य संख्येच्या म्हणजेच 11 च्या 2/3 बहूमतापेक्षा कमी आहे म्हणून अविश्वास प्रस्ताव पारित होणार नाही.

## काही उदाहरणे .....

- पंचायतीची एकूण सदस्य संख्या 11 आहे, तथापी त्यापैकी 1 सदस्याने राजीनामा दिल्यामुळे त्याची जागा रिक्त आहे. त्यामुळे अविश्वास प्रस्ताव दाखल होतांना नोटीसवर 10 च्या 1/3 म्हणजेच 10/3= 3.33 म्हणून पूर्णांकात 4 सदस्यांच्या स्वाक्षरी पाहिजेत. तसेच प्रस्तावाचे बाजूने 10/3 = 3.33 म्हणून 3.33 x 2= 6.66 म्हणून पूर्णांकात 7 मते पडली तर तो ठराव पारित होईल.

## महिला राखीव असलेल्या सरपंच पदासंदर्भात ठराव मंजूर होण्यासाठी आवश्यक बहूमत ?

ग्रामपंचायतीचे सरपंच पद जर कोणत्याही प्रवर्गातील महिलेसाठी राखीव असेल व अशा पदावर महिला सरपंच कार्यरत असेल तर अविश्वास ठराव मंजूर होण्यासाठी पंचायतीच्या सभेस उपस्थित राहण्याचा व मत देण्याचा हक्क असणा-या ग्रामपंचायत सदस्य संख्येच्या ¾ (तीन चतुर्थांश) बहुमतांनी असा ठराव मंजूर होणे आवश्यक आहे.

तथापी सरपंच पद हे सामान्य (बिगर राखीव ) असेल व अशा ठिकाणी सरपंचपदी एखाद्या महिलेची निवड झाली असेल तर मात्र तिचे विरुध्द अविश्वासाचा ठराव मंजूर करण्यासाठी 2/3 इतकेच बहूमत लागेल.

# मतदानाची पध्दत ?

1. अविश्वास ठरावावर मतदान कोणत्या पध्दतीने घ्यावे, उदा. हात वर करुन घ्यावे किंवा मतपत्रिकेद्वारे घ्यावे याबाबत अधिनियमात पध्दती ठरवून देण्यात आलेली नाही म्हणून हात उंच करुन मतदान करण्याची पध्दत प्रचलित आहे. गुप्त मतदान घेतले नाही म्हणून अविश्वास ठराव अवैध होत नाही.
2. कोणत्या सदस्यांनी ठरावाच्या बाजूने मतदान केले त्यांची संख्या व नांवे तसेच कोणत्या सदस्यांनी ठरावाच्या विरोधात मतदान केले त्यांची संख्या व नांवे याची नोंद इतिवृत्तात स्पष्टपणे घेतली पाहीजे. काही वेळा इतिवृत्तात ठरावाच्या बाजूने आणि विरोधात मतदान केलेल्या सदस्यांची फक्त संख्या नमूद केली जाते, नांवे नमूद केली जात नाहीत, तथापि ही बाब अत्यंत चुकीची असून मतदानावेळी ठरावाच्या बाजूने आणि विरोधात मतदान केलेल्या सदस्यांची नांवे इतिवृत्तात नमूद करणे अत्यंत आवश्यक आहे.

# इतिवृत्त नोंदवहीत घ्यावयाच्या नोंदी.

- इतिवृत्त नोंदवहीत सर्व उपस्थित सदस्यांची नांवे व स्वाक्षरी असली पाहिजे.

- इतिवृत्ताचे शेवटी ग्रामपंचायतीचा सचिव म्हणजेच ग्रामसेवक व अध्यासी अधिकारी म्हणजेच तहसिलदार यांची नांवे स्वाक्षरीसह सुस्पष्ट लिहीली पाहिजेत. तसेच स्वाक्षरी दिनांकासह असली पाहिजे.

# सभा संपल्यानंतर करावयाची कार्यवाही !

सभा संपल्यानंतर त्याच दिवशी किंवा पुढील दिवशी तहसिलदारांनी जिल्हा परिषद, पंचायत समिती, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त यांना इतिवृत्ताच्या प्रतीसह अहवाल पाठवावा. व असा अहवाल पाठविल्याची नोंद संचिकेमध्ये असावी.......

**तहसिलदार रावेर यांचे कार्यालय**

क्र/ग्रामप/अविश्वास ३५/२०१३ दिनांक :- ०४/०४/२०१३

---

**नोटीस**

**प्रति,**

**नाव- श्री /श्रीमती- कल्पनाबाई भाऊराव महाजन**

हुद्दा- सरपंच, ग्रामपंचायत पुरी/ गोलवाडे. ता रावेर जि जळगाव

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३५ (१) नुसार दि. ०४/०४/२०१३ रोजी श्री. अशोक त्र्यंबक पाटील, उपसरपंच, ग्रामपंचायत पुरी/ गोलवाडे. ता रावेर जि जळगाव यांचे विरुध्द अविश्वास प्रस्ताव दाखल झालेला असून सदर प्रस्तावाचे नोटीसीत नमूद मुद्दयांवर चर्चा व मतदान घेणेकामी **बुधवार दि. १०/०४/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालय, पुरी/ गोलवाडे,** ता. रावेर जि. जळगाव येथे विशेष सभा आयोजित केलेली आहे. तरी सदर सभेस आपण बिनचूक हजर रहावे. दाखल झालेल्या **अविश्वास प्रस्तावाच्या नोटीसीची प्रत सोबत जोडली आहे.**

**तहसिलदार रावेर**

**तहसिलदार रावेर यांचे कार्यालय**

क्र/ग्रामप/अविश्वास/३५ /२०१३ दिनांक :- ०४/०४/२०१३

**नोटीस**

**प्रति,**

**नाव- श्री /श्रीमती- सर्व सदस्य, ग्रामपंचायत पुरी/ गोलवाडे**

हुद्दा- सदस्या, ग्रामपंचायत पुरी/ गोलवाडे. ता रावेर जि जळगाव

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३५ (१) नुसार दि. ०४/०४/२०१३ रोजी श्री. अशोक त्र्यंबक पाटील, उपसरपंच, ग्रामपंचायत पुरी/ गोलवाडे. ता रावेर जि जळगाव यांचे विरुध्द अविश्वास प्रस्ताव दाखल झालेला असून सदर प्रस्तावाचे नोटीसीत नमूद मुद्दयांवर चर्चा व मतदान घेणेकामी **बुधवार दि. १०/०४/२०१३ रोजी सकाळी ११.००** वाजता **ग्रामपंचायत कार्यालय, पुरी/ गोलवाडे,** ता. रावेर जि. जळगाव येथे विशेष सभा आयोजित केलेली आहे. तरी सदर सभेस आपण बिनचूक हजर रहावे. **दाखल झालेल्या अविश्वास प्रस्तावाच्या नोटीसीची प्रत सोबत जोडली आहे.**

**तहसिलदार रावेर**

**प्रत**- मा.विभागीय आयुक्त सो. नाशिक विभाग, नाशिक यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत-** मा.जिल्हाधिकारी सो. जळगाव यांचे यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत**- म. मुख्यकार्यकारी अधिकारी सो. जि.प.जळगाव यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत-** गटविकास अधिकारी, पंचायत समिती रावेर यांचेकडेस माहितीस्तव रवाना.

**प्रत- ग्रामसेवक ग्रामपंचायत पुरी/ गोलवाडे यास --**

२/- विशेष सभेच्या दिवशी व वेळी आपण प्रोसिडींग बुकासह हजर रहावे. तसेच सोबत जोडलेल्या अविश्वास प्रस्तावाची एक प्रत ग्रामपंचायत कार्यालय पुरी/ गोलवाडे च्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करावी व तसा अहवाल इकडेस सादर करावा.

प्रत- मुलकी शिपाई, तहसिल कार्यालय रावेर --

२/- सदर नोटीस व अविश्वास प्रस्तावाची एक प्रत तहसिल कार्यालय रावेरच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करावी व तसा अहवाल इकडेस सादर करावा.

**प्रत- तलाठी पुरी/ गोलवाडे यांस**

२/- सदरच्या नोटीसा व त्यासोबत दाखल झालेल्या अविश्वास प्रस्तावाची प्रत संबंधित सदस्य यांचेवर बजावून त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घ्यावी, व तसा अहवाल सादर करावा. संबंधित सदस्य घरात नसतील तर सभेची सुचना व अविश्वास प्रस्तावाची प्रत त्या घरातील इतर प्रौढ सदस्यास द्यावी व त्यांनी न घेतल्यास त्यांचे राहते घराचे पुढच्या दरवाज्यावर चिकटवावी, व तशा आशयाचा पंचनामा करावा.

ग्रामपंचायत पुरी/ गोलवाडे. ता रावेर येथील उपसरपंच श्री. अशोक त्र्यंबक पाटील, यांचे विरुध्द दि. ०४/०४/२०१३ रोजी दाखल झालेल्या अविश्वास प्रस्तावावर चर्चा व मतदान घेणेकामी बुधवार दि.१०/०४/२०१३ रोजी आयोजित केलेल्या **विशेष सभेची तहसिलदार रावेर यांचेकडील नोटीस** क्र. /ग्रामप/३५/२०१३ दि. ०४/०४/२०१३ मिळाले बाबत स्वाक्षरी.

---

| अ.क्र. | सदस्यांची नावे | स्वाक्षरी व तारीख |
|---|---|---|
| १. | सौ. कल्पनाबाई भाऊराव महाजन | |
| २. | सौ. पद्मबाई सुरेश पाटील | |
| ३. | अशोक त्र्यंबक पाटील | |
| ४. | लक्ष्मण रामदास तायेडे | |
| ५. | अजय दिनकर पाटील | |
| ६. | एकनाथ काशिनाथ तायडे | |
| ७. | श्रीराम परशुराम शेलोरे | |
| ८. | सौ. उर्मिलाबाई सुनिल तायडे. | |

---

**प्रति, मा. तहसिलदार रावेर**

आपणाकडील **नोटीस** क्र./ग्रामप/३५/२०१३ दि. ०४/०४/२०१३ उपरोक्त नमूद सदस्यांवर मुदतीत बजावली असून त्याबाबत संबंधित सदस्याची स्वाक्षरी घेऊन पोच सादर करीत आहे.

**तलाठी पुरी/ गोलवाडे**

ग्रामपंचायत पुरी/ गोलवाडे. ता रावेर येथील उपसरपंच श्री. अशोक त्र्यंबक पाटील, यांचे विरुध्द दि. ०४/०४/२०१३ रोजी दाखल झालेल्या **अविश्वास प्रस्तावाची प्रत** तहसिलदार रावेर यांचेकडील नोटीस क्र./ग्रामप/३५/२०१३, दि. ०४/०४/२०१३ यासोबत मिळाले बाबत स्वाक्षरी.

---

| अ.क्र. | सदस्यांची नावे | स्वाक्षरी व तारीख |
|---|---|---|
| १. | सौ. कल्पनाबाई भाऊराव महाजन | |
| २. | सौ. पद्मबाई सुरेश पाटील | |
| ३. | अशोक त्र्यंबक पाटील | |
| ४. | लक्ष्मण रामदास तायेडे | |
| ५. | अजय दिनकर पाटील | |
| ६. | एकनाथ काशिनाथ तायडे | |
| ७. | श्रीराम परशुराम शेलोरे | |
| ८. | सौ. उर्मिलाबाई सुनिल तायडे. | |

---

**प्रति, मा. तहसिलदार रावेर**

आपणाकडील नोटीस क्र./ग्रामप/३५/२०१३ दि. ०४/०४/२०१३ यासोबतची **अविश्वास प्रस्तावाची प्रत** उपरोक्त नमूद सदस्यांवर मुदतीत बजावली असून त्याबाबत संबंधित सदस्याची स्वाक्षरी घेऊन पोच सादर करीत आहे.

**तलाठी पुरी/ गोलवाडे**

# धन्यवाद



